नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 23/01/2021 (शनिवार)
(सकाळ)

---

## चोरी

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 01 कि.मी अंतरावर मौजा राज बाबा बियर किराणा स्टोर येथे दिनांक 22/01/2021 चे 20.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– गणेश मोहनलाल गुरूदासानी, वय 27 वर्ष, रा. काठीवली एन 723 कामठी व त्यांचा भाउ हे दोघेही किराणा दुकान बंद करून त्यांचे चारचाकी गाडीने त्यांचे राहते घराकडे निघत असतांना त्यांचे चारचाकी गाडीच्या मागील चाक पंचर दिसले. फिर्यादी हे त्यांच्या गाडीचा दार उघडा ठेवून स्टेपनी बदलत असतांना अज्ञात आरोपीने फिर्यादी व त्यांचे भावाची नजर चूकवून गाडीमधील फिर्यादींचे जवळ आलेले किराणा दुकानाची दिवस भराची नगदी 35,000/–रू. व दोन आयफोन ज्यातील एकाची किं 20,000/–रू. व दुसरयाची की 5,000/– रू. असा एकुण 60,000/–रू. चा माल गाडीचे समोरील सीट वर एका काळया रंगाची हॅन्डबॅग मध्ये ठेवलेला मुद्देमाल चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा ठाकरे मो.न. 9822764999 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

1) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत मौजा वारेगाव येथे दिनांक 18/01/2021 चे 17:00 वा. ते दिनांक 22/01/2021 चे 20.00 वा. दरम्यान महेश काशीराम राउत, वय 22 वर्ष, रा. बिना संगम, तह. कामठी, जि. नागपूर हा त्याच्या ताब्यातील एमएच– 40/ एझेड– 1707 क्रमांकाच्या मोपेडने त्याचा मित्र नामे– वैभव सिध्दार्थ गजभिये, वय 22 वर्ष, रा. बिना संगम, तह. कामठी, जि. नागपूर याचे सह भोयर यांचे विटा भट्टी कडून बिना संगम कडे जात होते. त्यादरम्यान वारेगाव कडून येणारा एमएच– 40/एके– 6713 क्रमांकाचा दहाचाकी ट्रकचा चालक आरोपीने त्याचे ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मोपेडला धडक दिली. या अपघातात मोपेड चालक महेश राउत याचा मृत्यू झाला तर मागे बसलेला वैभव राउत हा गंभीर जखमी झाला.

सदर प्रकरणी सर. तर्फे पोउपनि श्री निमगडे पोस्टे खापरखेडा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री निमगडे पो स्टे खापरखेडा मो न 8999917112 हे करीत आहे.

2) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 10 कि. मी. मौजा कन्हैयाडोल येथे दिनांक 17/01/2021 चे 11:30 वा. दरम्यान एमएच– 40/एसआर– 8598 क्रमांकाचा मोटरसायकलचा चालक आरोपी नामे– तेजस्वर दिनदयाल फसाटे याने त्याचे मोटरसायकल मागे सौ. सुनंदा लक्ष्मण मानकर (मृतक) वय 60 वर्ष हिला बसवुन घेवुन जात असतांना कन्हैयाडौल शिवारात त्याने त्याचे ताब्यातील मोटरसायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन ब्रेकरवर मोटरसायकल उसळल्याने मागे असलेली सौ. सुनंदा मानकर हि खाली पडली. त्यामुळे तिच्या डोक्यावर गंभीर मार लागल्याने तिला उपचाराकामी प्रथम पी एच सी मोहपा, ग्रामीण कळमेश्वर व नंतर मेडीकल कॉलेज नागपुर येथे नेले असता दिनांक 17/01/21 चे 18.15 वा. डाक्टरांनी मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी सर. तर्फे मपोहवा संगिता डाखोरे पोस्टे. सावनेर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा नारायन बोरकर 9823581297 हे करीत आहे.

3) पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 30 कि. मी. नांद येथे दिनांक 22/01/2021 चे 08:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– दिलीप महादेव चवरे, वय 36 वर्ष, रा. झमकोली टेकडी यांचे वडील नामे– महादेव कवडु चवरे(मृतक), वय 65 वर्ष, झमकोली टेकडी व मामा हे दोघेही झमकोली व भिसी एमएच– 31/क्यु– 998 क्रमांकाचा मोटरसायकलने जात होते. त्यादरम्यान एमएच– 40/क्यु– 9905 क्रमांकाच्या मोटरसायकलचा चालक आरोपीने आपली मोटरसायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन विरूद्ध दिशेने येवुन फिर्यादीच्या वडीलाचे गाडीला धडक दिली. या अपघातात फिर्यादीचे वडील महादेव कवडु चवरे यांचा जागीच मृत्यु झाला व त्या मोटारसायकल च्या मागे बसलेले फिर्यादीचे मामा अनिल महादेव वारेकर, वय 50 वर्ष हे जखमी झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री. चनगोले मो 9823380815 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर